# वसमतला ई- ग्रंथालय संगणक प्रणालीची सुरवात

## श्री गुरू ईश्वर शिवाचार्य महाराज वाचनालयात आधुनिक तंत्रज्ञानाचा अवलंब

**वसमत, ता. १४ (बातमीदार)** : श्री गुरू ईश्वर शिवाचार्य महाराज सार्वजनिक वाचनालयाने अधुनिक तंत्रज्ञानाचा अवलंब करीत इ-ग्रंथालय या संगणक प्रणालीची सुरवात केली आहे. यामुळे आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून इ- सेवा पुरविणाऱ्या महाराष्ट्रातील मोजक्या सार्वजनिक ग्रंथालयात वसमतच्या ग्रंथालयाचा समावेश होणार आहे.

रंगसभा प्रतिष्ठान, श्री गुरू ईश्वर शिवाचार्य महाराज सार्वजनिक वाचनालयाच्या वर्धापन दिनानिमित्त अखिल भारतीय साहित्य संमेलनाचे अध्यक्ष डॉ. नागनाथ कोत्तापल्ले यांच्या हस्ते सोमवारी (ता.३) इ-ग्रंथालय संगणक प्रणालीचे उद्घाटन करण्यात येणार आहे. यामुळे राजकीय, सांस्कृतिक, साहित्यिक, शेती क्षेत्राबरोबरच अधुनिक तंत्रज्ञानात वसमतचा ठसा उमटला आहे. इ-ग्रंथालय संगणक प्रणालीसाठी दिल्ली येथील नॅशनल इन्फॉर्मेशन सेन्टरने हा सॉफ्टवेअर विकसित केला असून तो बापरण्यासाठी रामकुमार मटोरिया, पुणे येथील डॉ. मनोज कुलकर्णी यांचे मार्गदर्शन लाभले आहे.

इ-ग्रंथालय संगणक प्रणालीमुळे एखादे विशिष्ट पुस्तक त्याच्या नावाने, लेखकाच्या नावाने, प्रकाशक अथवा विषयानुसार तत्काळ शोधता येते. याशिवाय पुस्तकाची देवाणघेवाण, वर्गीकरण, ग्रंथालयाचे नियतकालिकांचे, व्यावस्थापन, इ- सेवा संगणक प्रणालीत उपलब्ध असल्यामुळे वाचकाला विनाविलंब विविध पुस्तके मिळू शकतात. इ-ग्रंथालय सुविधेमुळे आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर करून वाचकांना तत्काळ सेवा देणाऱ्या महाराष्ट्रातील मोजक्या सार्वजनिक ग्रंथालयात श्री गुरू ईश्वर शिवाचार्य महाराज सार्वजनिक वाचनालयाचा समावेश होणार आहे. याशिवाय ग्रंथालयात विविध विषयांवरचे दहा हजार ग्रंथ उपलब्ध असून स्पर्धा परीक्षांना लागणारी अनेक पुस्तके उपलब्ध आहेत. लवकरच जगभरातील वाचकांसाठी वाचनालयाची वेबसाईट सुरू करण्यात येणार असल्याची माहिती ग्रंथपाल शेख इब्राहिम यांनी दिली.



**वसमत : गुरू ईश्वराचार्य वाचनालयात संगणकीय प्रणाली सुरू झाल्यानंतर अ. भा. मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष डॉ. नागनाथ कोतापल्ले यांनी त्याची माहिती करून घेतली.**

14/3/2013